राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत उसरोली ग्रुप ग्रामपंचायत, ता.मुरूड, जि.रायगड येथील उसरोली तलाव संवर्धन प्रस्तावास प्रशासकीय मान्यतेसह अंतिम मान्यता प्रदान करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०२४/प्र.क्र.१२/तां.क.३**
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८ मार्च, २०२६.

**वाचा :-** १) पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र.इएनव्ही २००८/प्र.क्र.६९/तां.क.३, दि.२७.०८.२००८
२) दिनांक ०४.०७.२०२३ रोजीच्या सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३) पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र. रासयो-२०२४/प्र.क्र.१२/आस्थापना-अ, दि.१८.०१.२०२४
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड, जि. रायगड यांचा दि.०४.०३.२०२५ रोजीचा प्रस्ताव.
५) सुकाणू समितीच्या दि.१६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना -**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेंतर्गत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरु केली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड, जि.रायगड यांच्यामार्फत सादर उसरोली तलाव संवर्धन प्रस्तावास वाचा क्र.४ मध्ये नमूद दि.१८.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१४६.०० लक्षच्या मर्यादेत तत्त्वत: मान्यता देण्यात आली होती. तसेच रुपये ७३,००,०००/- (रुपये त्र्याहत्तर लक्ष फक्त) इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, जि.रायगड यांना वितरित करण्यात आला होता.

दरम्यानच्या काळात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, जि.रायगड यांनी विभागास सादर केलेला उसरोली येथील गावतलाव संवर्धनाचा रुपये १,४५,४२,४७३/- इतक्या किंमतीचा सुधारित प्रस्ताव दि.१६.०२.२०२६ रोजी झालेल्या सुकाणू समितीसमोर ठेवण्यात आला. सदर तलाव संवर्धनाच्या रुपये १,४५,४२,४७३/- इतक्या किमतीच्या प्रस्तावास दि.१६.०२.२०२६ रोजीच्या सुकाणू समितीने प्रशासकीय मान्यतेसह अंतिम मान्यता देण्याची शिफारस केली आहे. त्यानुषंगाने आता उसरोली येथील गावतलाव संवर्धनाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यतेसह अंतिम मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत दि.१६.०२.२०२६ रोजी झालेल्या सुकाणू समितीने शिफारस केल्यानुसार उसरोली येथील गावतलावाचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धनासाठी सोबत जोडलेल्या "प्रपत्र अ" मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी एकूण रुपये १,४५,४२,४७३/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचेचाळीस लक्ष बेचाळीस हजार चारशे त्र्याहत्तर फक्त) इतक्या रकमेस खालील अटी व सोबत जोडलेल्या "प्रपत्र ब "मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर मंजूर एकूण रकमेपैकी ९०% हिस्सा म्हणून राज्य शासन व १०% हिस्सा म्हणून ग्रामपंचायत निधी उपलब्ध करून देईल. सदर योजनेचा वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे राहील -

| अ.क्र. | हिस्सा | मंजूर निधी | अक्षरी मंजूर निधी |
|---|---|---|---|
| १ | **९०% राज्य हिस्सा** | १,३०,८८,२२६/- | अक्षरी रुपये एक कोटी तीस लक्ष अठ्ठयाऐंशी हजार दोनशे सव्वीस फक्त |
| २ | **१०% ग्रामपंचायत हिस्सा** | १४,५४,२४७/- | अक्षरी रुपये चौदा लक्ष चोपन्न हजार दोनशे सत्तेचाळीस फक्त |
| | **एकूण** | **१,४५,४२,४७३/-** | **अक्षरी रुपये एक कोटी पंचेचाळीस लक्ष बेचाळीस हजार चारशे त्र्याहत्तर फक्त** |

एकूण मंजूर निधीपैकी ग्रामपंचायत हिस्सा हा राज्य शासनामार्फत वितरित केलेल्या हिश्श्याच्या १०% या प्रमाणे प्रथमतः बँक खात्यात जमा करण्यात यावा.

२. **वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०.२१/प्र.क्र.६३/अर्थोपाय, दि.२८/१०/२०२५ नुसार जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना सन २०२३-२०२४ मध्ये वितरीत केलेला व अद्यापपर्यंत अखर्चित असलेला निधी दि.२८.०२.२०२६ पर्यंत खर्च करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापि, दि.२८.०२.२०२६ नंतर अखर्चित असलेला निधी शासन जमा करणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार संदर्भाधीन वाचा क्र. ३ मध्ये नमूद दि.१८.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये उसरोली तलाव संवर्धन प्रकल्पासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना वितरीत करण्यात आलेला रुपये ७३,००,०००/- (रुपये त्र्याहत्तर लक्ष फक्त) इतका निधी शासन जमा करणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांचेमार्फत सदर निधी शासन जमा करण्यात आल्यानंतर विभागाकडे असलेल्या निधीच्या उपलब्धतेनुसार उसरोली तलाव संवर्धन प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.**

३. प्रस्तूत शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्रक्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७ एप्रिल, २०२५ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२८१७३०४६०००४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department,
2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.03.28 17:32:11 +05'30'

**( रमेश मु. मनाळे ),**
**सह सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मुंबई
२. मा.मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. अ.मु.स., वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल), मंत्रालय, मुंबई
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा) १. महाराष्ट्र मुंबई-४०००२०
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई- ४०००२०
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरिक्षा) २. महाराष्ट्र, नागपूर
१२. अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखाधिकारी, मुंबई
१५. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
१६. मुख्यलेखा परिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, मुंबई
१७. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१८. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.
१९. रोखशाखा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. निवडनस्ती (कार्यासन तां.क.३).

## शासन निर्णय क्र. रासयो-२०२४/प्र.क्र.१२/तां.क.३, दि.२८ मार्च, २०२६ चे सहपत्र

## "प्रपत्र-अ"

| Sr. No. | Name of the Work | Amount |
|---|---|---|
| **A** | **CORE WORK** | |
| 1 | Desilting | 2205961 |
| 2 | Pitching | 876949 |
| 3 | Gabion structure | 1892446 |
| 4 | Paver block on pathway and railing | 1737504 |
| 5 | Chain link fencing | 3627789 |
| 6 | Over flow outlet pipe | 326975 |
| | **Total of CORE WORK (A)** | **10667624** |
| **B** | **NON CORE WORK** | |
| 7 | Solar lamp on street and garden | 1656506 |
| | **Total of NON CORE WORK (B)** | **1656506** |
| | **Total for Core works and Non Core works (A + B)** | 12324130 |
| | Add 18% GST on (A + B) | 2218342.40 |
| | **Total Amount (A+B)** | 14542473.40 |
| | **GRAND TOTAL** | **14542473.00** |

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department, 2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.03.28 17:32:26 +05'30'

(रमेश मु. मनाळे ),
सह सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
महाराष्ट्र शासन

## शासन निर्णय क्र. रासयो-२०२४/प्र.क्र.१२/तां.क.३, दि.२८ मार्च, २०२६ चे सहपत्र

## "प्रपत्र-ब"

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत **उसरोली ग्रुप ग्रामपंचायत, ता.मुरूड, जि.रायगड हद्दीतील उसरोली गावतलाव संवर्धन** कामांसाठीच्या अटी व शर्ती -

१. प्रपत्र-अ मधील नमूद कामांना प्रथमत: तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेण्यात यावी. योजनेच्या प्रत्येक टप्यात हाती घेण्यात येणाऱ्या कामाचे मंजूर तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रके, नकाशे, संकल्पचित्रे इ. काम सुरू करण्यापूर्वी शासनास सादर करणे बंधनकारक असेल. उपरोक्त माहिती शासनास सादर केल्यानंतरच प्रकल्पाची कामे सुरू करण्यात यावीत. हाती घ्यावयाच्या ("प्रपत्र-अ" मधील नमूद कामे) कामासंबंधित तलावाच्या सद्यस्थितीची वेळोवेळी छायाचित्रे घेण्यात यावी, तसेच व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात यावे व कामांच्या प्रगतीनुसार दर दोन महिन्यांनी याप्रकारे छायाचित्रण करण्यात यावे.

२. तलाव संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था /शासकीय प्राधिकरण/ मंडळ यांची **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था** म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी विहित पध्दतीने नियुक्ती करावी. ही संस्था "प्रपत्र-अ" नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी. एस. आर. प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. जिल्हा परिषद, रायगड यांनी प्रकल्पासाठी तांत्रिक मनुष्यबळ तयार होण्यासाठी या संस्थेचा उपयोग करावा.

३. शासनाने वितरित केलेल्या निधीच्या विहित प्रमाणात उसरोली ग्रामपंचायत यांनी त्यांचा अनुज्ञेय हिस्सा खात्यात जमा करावा. सदर हिस्सा प्रकल्पावर खर्च केल्याशिवाय पुढील हप्ता वितरीत करण्यात येणार नाही.

४. कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची असेल. सदर प्रकल्पाच्या कामासाठी लागणारा निधी खर्च करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या देखरेखेखाली करण्यात यावा.

५. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली **प्रकल्प अंमलबजावणी समितीची** स्थापना करण्यात यावी. सदर समितीत जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यावरण विषयक तज्ञ, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यासह जिल्हा परिषदेस आवश्यक वाटतील अशा प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. सदर समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल व कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवेल. सदर समितीची आढावा बैठक दर महिन्याला आयोजित करण्यात यावी.

६. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय तलावाचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने योजनेंतर्गत प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यावरही सदर समिती बैठका आयोजित करेल. सदर समिती भौतिक बाबींची देखभाल, प्रकल्पांपासून मिळणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील.

७. काम पूर्ण झाल्यावर पुढील किमान १० वर्षांपर्यंत तलावाची देखभाल व दुरुस्ती जिल्हा परिषद, रायगड यांनी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच जिल्हा परिषद, रायगड प्रकल्प अंमलबजावणी समितीचा अहवाल प्रत्येक ६ महिन्यांनी शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करेल.

८. तलावाच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील प्रयोगशाळेची /संस्थेची/ मंडळाची नियुक्ती करून प्रतिमाह पाण्याची गुणवत्ता तपासण्यात यावी. सदर प्रयोगशाळा/संस्था/ मंडळामार्फत पाण्याच्या गुणवत्तेचा मासिक अहवाल प्रकल्प सनियंत्रण समितीस व पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास दर तीन महिन्यांनी सादर करण्यात यावा.

९. उपरोक्त मुद्यांनुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड हे शासनास दर तीन महिन्याला पुढील अहवाल शासनास सादर करतील -

अ. मजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल.
ब. पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती.
क. प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत.
ड. खर्चाचे प्रत्येक तिमाहीचे उपयोगिता प्रमाणपत्र.

१०. सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्यातील निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या १० तारखेपर्यंत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर करावे. **उपरोक्त मंजूर प्रकल्पासाठी निधी उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्यात येईल.**

११. योजनेंतर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीप्रमाणे व विहित कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. सदर निधी इतर कोणत्याही प्रयोजनार्थ वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा परिषद, रायगड यांची असेल.

१२. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बँकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. सदर निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्याव्दारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणाऱ्या बँक पासबुकची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

१३. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधांपासून मिळणारे उत्पन्न हे या प्रकल्पासाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यात यावे. सदर उत्पन्नातून तलाव संवर्धनाची अतिरिक्त कामे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या पूर्वपरवानगीने हाती घेता येतील. मात्र तलाव संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसूली निधी वापरता येणार नाही.

१४. **सदर कामे शासन आदेशाच्या दिनांकापासून २४ महिन्यात किंवा तत्पूर्वी पूर्ण करण्यात यावीत** व तलाव संवर्धनाचे काम पूर्ण झाल्यानंतर झालेल्या कामांचे तृतीय पक्ष लेखापरिक्षण अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

१५. मंजूर बाबीतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुसऱ्या उपांगासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या पूर्वपरवानगीने वापरता येईल.

१६. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च योजना कार्यान्वित झाल्यानंतर जिल्हा परिषद, रायगड यांनी स्वतःच्या निधीतून भागवावयाचा आहे.

१७. योजनेतर्गत खर्च करण्यात येणाऱ्या रकमेचे लेखे प्रचलित लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याव्दारे करण्यात यावे तसेच त्याचा अहवाल पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास पाठविण्यात यावा. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षाअखेर झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित महालेखापाल कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची राहील.

१८. तलावांच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी जिल्हा परिषदेने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

१९. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतील हॉटेलमधून/ लोकवस्तीतून / वाणिज्यिक आस्थापनेतून निघणारे सांडपाणी तलावात जाणार नाही याची जबाबदारी संबंधित स्थानिक संस्थेची असेल.

२०. प्रकल्पासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झाल्यास सदर अधिकची रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. सदर प्रकल्पासाठी शासनाने वितरीत केलेली रक्कम विवक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकत नसेल तर सदर रक्कम विवक्षित वेळेनंतर खर्च करण्यास पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल.

२१. प्रकल्पासाठी वितरीत करण्यात आलेली रक्कम योग्यरितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करु शकेल.

२२. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या परवानगीशिवाय तलावात बोटींगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच यांत्रिक बोटींचा वापर तलावात कुठल्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय असणार नाही. फक्त पॅडल बोटचा वापर अनुज्ञेय असेल.

२३. तलावात मत्स्यमारी शक्यतो करण्यात येऊ नये, मत्स्यमारी करावयाची झाल्यास फक्त मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यासाठी परवानगी देण्यात यावी. अशावेळी १० इंच व त्यापेक्षा लहान आकाराच्या माशांना पकडण्याची मुभा देण्यात येऊ नये. स्थानिक परिस्थितीनुसार याबाबत प्रकल्प संनियंत्रण समिती वेळोवेळी निर्णय घेईल.

२४. योजनेवरील कामासाठी राज्य शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त शासनाकडून, वित्तीय संस्थांकडून वा आणखी कोणत्याही संस्थांकडून प्राप्त निधी सदर योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येऊ नये. (No overlapping of Schemes)

२५. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणाऱ्या राज्य शासनाच्या अधिकाऱ्यास आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.

२६. योजनेंतर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे, त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२७. योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या कामांचे व समन्वयाचे काम राज्यस्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. सदर समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२८. योजनेंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आस्थापनेवरील व लागणाऱ्या मनुष्यबळावरील खर्च संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेव्दारे करण्यात येईल. त्यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२९. योजनेंतर्गत तलावातून काढण्यात येणाऱ्या गाळांचे अभिलेख व छायाचित्रांसह पुरावे जिल्हा परिषद रायगड यांनी जतन करावेत. तसेच गाळाच्या विल्हेवाटीची अभिलेखामध्ये नोंद करून ठेवावी.

३०. तलाव संवर्धनाबाबत मंजूर कामांमध्ये तलावातील गाळ काढणे व सिल्ट ट्रॅप लावण्याच्या कामाचा समावेश असल्यास, तलावाच्या गाळ काढण्याच्या कामाबरोबरच तसेच पावसाळ्यापूर्वी सिल्ट ट्रॅप लावण्याचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा तलावात पुन्हा गाळ जमा होऊ शकतो.

३१. उपरोक्त मंजूर कामांसह तलावाभोवती वनीकरण(Tree plantation/ Afforestation) करण्यात यावे. वनीकरण करतांना स्थानिक झाडांच्या लागवडीसह शासनाचे विविध अभियान/ उपक्रम यांची उद्दिष्ट्ये साध्य होतील-जसे Bomboo Mission, Miyawaki Plantation अशा पद्धतीने वनीकरण करण्यास प्राधान्य देण्यात यावे. तसेच जमिनीची धूप रोखण्यासाठी आणि काही प्रमाणात नैसर्गिकरित्या जलशुद्धीकरणासाठी वाळा (Vetiver), खस, कर्दळी (Canna), शेवगा (Moringa) इ. स्वरूपाच्या वनस्पतींची लागवडीचा समावेश करण्यात यावा.

३२.तलावाच्या कामास सुरूवात करण्यापूर्वीची छायाचित्रे विभागास सादर करावीत.

३३.राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तीचे पालन करणे जिल्हा परिषद रायगड यांना बंधनकारक राहील.

३४. योजनेंतर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

३५. योजना कालमर्यादित पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करिता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

३६. योजनेंतर्गत मंजूर कामांच्या निविदा ह्या शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विहित प्रक्रियेचा अवलंब करून स्विकाराव्यात. तसेच प्रकल्पांतर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किमतीच्या निविदा स्विकारण्यात येऊ नयेत.

३७. कंत्राटदाराने विहित वेळेत काम पूर्ण न केल्यास संबंधितांवर दंड आकारण्याची तरतूद ठेवण्यात यावी.

३८. योजनांतर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई/नागपूर यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल.

३९. योजना पूर्ण झाल्यावर भविष्यात तलावाच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा तलावासंदर्भात कोणतीही नवीन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची मान्यता घेण्यात यावी.

४०. तलावाच्या क्षेत्राबाबत, मालकीबाबत, राबविण्यात येणाऱ्या कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच Surface floating wetland beds बाबत वा इतर संबंधित बाबींबाबत भविष्यात काही न्यायालयीन वा अन्य बाबी उद्भवल्यास संबंधित जिल्हा परिषद सर्वस्वी जबाबदार राहील.

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department,
2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.03.28 17:32:38 +05'30'

**(रमेश मु. मनाळे ),**
**सह सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**महाराष्ट्र शासन**